महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे विभागीय मंडळ, पुणे -४११००५

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Pune Divisional Board, Pune - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

Email sscboardpune@gmail.com
Website : www.sscboardpune.in


कालमर्यादित/तातडीचे

क्रमांक - पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.ह./792
दिनांक : ०५/०२/२०२५. 06

प्रति,

१.शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, पुणे, अहमदनगर , सोलापूर.
२. सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/ उच्च माध्यमिक शाळा/ क.महाविद्यालय

**विषय - सन २०२३ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.१०वी व इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांचा परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेकरीता उर्वरित विद्यार्थ्यांचे बँक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल दि. ०३ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत उपलब्ध असल्याबाबत.**

संदर्भ
१. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.ह./६३६ दि. १८ जुलै २०२५
२. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.ह./४१८१ दि.०५ ऑगस्ट २०२४
३. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.ह./६५१४ दि.१२ डिसेंबर २०२४
४. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.ह./६०१३ दि.१२ नोव्हेंबर २०२४
५. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.ह./६३६ दि.२४ जानेवारी२०२५
६.क्र.रा.मं./सन२०२३ दुष्काळ ख ह/४३९ दि.३१ जानेवारी २०२५

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि.०१/०८/२०१९ व शुध्दीपत्रक दि.०३/०२/२०२० अनुसार, विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा राज्यमंडळ कार्यालयाकडून विद्यार्थी पालकांच्या आधार संलग्न बँक खात्यात वर्ग करण्यात येत आहे. सन २०२३ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा बँकेकडून ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क त्यांचे आधार संलग्न बँक खात्यात वर्ग झाले नाहीत, असे बँकेकडून reject झालेल्या अथवा परीक्षाशुल्क परतावा रक्कम वर्ग न झालेल्या या विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांची यादी ईमेलद्वारे संदर्भीय पत्राद्वारे देण्यात येत आली आहे. परिक्षा फी परतावा लाभ अद्याप न मिळालेल्या एकुण २८५८९९ विद्यार्थ्यांची शाळा /कनिष्ठ महाविद्यालयनिहाय यादी ईमेलद्वारे विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना व.शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, पुणे, अहिल्यानगर , सोलापूर. दि.३१ जानेवारी २०२५ रोजीच्या संदर्भाधीन पत्र क्रमांक ६ अन्वये पाठविण्यात आलेली आहे.

पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा फी परतावा बँकेमार्फत करताना आलेल्या विविध त्रुटींची माहिती संदर्भाधीन पत्र क्रमांक १ते५ अन्वये विभागीय मंडळाच्या कार्यक्षेतील शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना व .शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, पुणे, अहिल्यानगर , सोलापूर. अवगत करण्यात आलेली आहे. बँकेकडुन प्राप्त झालेल्या अहवालानुसार आधार संलग्न प्रणालीद्वारे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती न होण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत. विद्यार्थ्यांचा / पालकांचे आधार क्रमांक npci यांचेशी संलग्न/जोडलेला नाही अथवा कार्यरत नाही , आधार बँक खात्याशी core banking solution मध्ये जोडलेला नाही आधार क्रमांक हे खातेदाराची जी बँक आहे ती खाजगी बँक अथवा सहकारी बँक या बँकेच्या वैयक्तिक संगणी जोडलेला नाही, खाते बंद केलेले आहे, खाते गोटवलेले आहे, अज्ञान खातेदाराचे सज्ञान झाल्यानंतर बँकेमध्ये कागदपत्राची आवश्यक पुर्तता न करणे, उपलब्ध झालेली माहिती अवैध असल्याने , जसे आधार क्रमांक चुकीचा KYC नाही इत्यादी खातेदाराच्या बँकेचा individual institute number चुकीचा आहे. Participant not mapped to product code असा तसेच duplicate transaction ref number मुळे परीक्षा शुल्क अदा न होण्याची कारणे बँकेकडून प्राप्त झालेली आहेत.

उपरोक्त त्रुटींची पुर्तता करुन निर्धारीत कालावधीत ऑनलाईन पोर्टलवर सुधारित माहिती सादर करण्याकरींता संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे. **शासनकडून उपलब्ध झालेल्या निधीचा विनीयोग आर्थिक वर्ष २०२४ -२५ संपण्यापूर्वी दि.३१ मार्च २०२५ अखेर होणे आवश्यक असल्याने** तसेच एकही पात्र विद्यार्थी फी परतावा योजनेपासून वंचित राहुनये यासाठी निर्धारीत मुदतीत ऑनलाईन पोर्टलवर माहिती अद्ययावत होणे गरजेचे आहे. याची सर्व संबंधित घटकांना जाणीव करुन देण्यात यावी.

परिक्षा शुल्क परतावा करणेकरीता पात्र विद्यार्थ्यांचे आधार लिंक असलेले बँक खाते तपशील, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड इ.माहितीमध्ये दुरुस्ती/ सुधारित माहिती सादर करण्याकरीता **ऑनलाईन पोर्टल दि. ०३ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सुरु करण्यात येत आहे.**

सन २०२३-२४ मध्ये जाहीर झालेया दुष्काळसदृश्य भागातील इ.१० व इ.१२ वीच्या परीक्षा शुल्क परतावा प्रलंबित असलेल्या एकुण २५८८९९ विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक तपशील व इतर माहिती दुरुस्ती सुधारित करण्याकरीता आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधीत माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांना अवगत करावे. सदर माहिती त्वरीत अदययावत करावी, अन्यथा होणा-या विलंबास आपण जबाबदार राहाल , याची नोंद घ्यावी.

**सोबत, संदर्भीय पत्र**

**(औदुंबर उकिरडे)**
**विभागीय सचिव**
**पुणे विभागीय मंडळ,**
**पुणे ४११००५.**

प्रत माहितीस्तव **सविनय सादर -**
मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.